महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६१ /२०२३ दि. २९/०४/२०२३

**—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—**

**ज्याअर्थी,** नवीन कळवा उड्डाणपुलामळे १) सिडको कडून कळवा नाका, २) जीपीओ कडून कळवा नाका, ३) साकेतकडुन कळवा नाका कडे जाण्या–या तीनही वाहिन्या सर्व प्रकारच्या वाहनांकरिता खुल्या झाल्यामुळे ठाणे शहराकडून कळवा व नवी मुंबई कडे जाणारी वाहतुक सुरळीत होत आहे. परंतु कळवा नवी मुंबई कडून ठाणे शहराकडे जाणारी वाहतुक जुन्या कळवा ब्रिजवरील एका वाहिनीने होत असल्याने वाहतुक संथ गतीने होवून वाहतूक कोंडी होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** ठाणे शहरातून सिडको, जीपीओ, साकेत कडून कळवा नाकाकडे जुना कळवा ब्रिज मार्गे जाण्यास जुना कळवा ब्रिज येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सिडको कडून कळवा नाकाकडे जाणारी वाहने पोलीस आयुक्तालय कार्यालय समोरील नवीन उड्डाणपुलाचा वापर करून कळवा नाका व बुधाजी नगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) जी.पी.ओ. कडून कळवा नाकाकडे जाणारी वाहने क्रिक नाका येथून डावे वळण घेवून नवीन उड्डाणपुलाचा वापर करून कळवा नाका व बुधाजीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

क) साकेत कडून कळवा नाका कडे जाण्या–या वाहने राबोडी वाहतुक उप विभाग कार्यालय समोरील नवीन उड्डाणपुलाचा वापर करून कळवा नाका व बुधाजीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**एकेरी मार्गाने प्रवेश चालू –** कळवा नाका कडून ठाणे शहराकडे जाणा–या वाहनांना जुना कळवा ब्रिजच्या दोन्ही वाहिनीवरून एकेरी मार्गाने **प्रवेश चालू** करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगीक तत्वावर लागु करण्यात येत असुन कोणाची काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरूपात पोलीस उपायुक्त कार्यालय, वाहतुक विभाग, तिन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. या बाबत काही सुचना अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना कायम स्वरूपात अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. कापुरबावडी, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner